# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय अर्थसंकल्पीय महासभा क्रमांक ३ चे इतिवृत्त

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **मंगळवार दिनांक २७/०२/२०२४ सकाळी ११-०० वाजता भारतरत्न स्व.अटलबिहारी वाजपेयी मुख्य सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करूणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | डॉ.संगीता नांदूरकर | उपायुक्त |
| ४. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ५. | श्री.हेमंत निकम | उपायुक्त |
| ६. | श्री.गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ७. | श्री.सुनिलकुमार सुर्यवंशी | प्र. मुख्य लेखा परिक्षक |
| ८. | श्रीमती पल्लवी शिरसाठ | मूल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी |
| ९. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| १०. | श्री.विनोद मोरे | नगररचनाकार |
| ११. | श्री.नवनीत सोनवणे | कार्यकारी अभियंता पा.पू.वि. |
| १२. | श्री.कैलास शिंदे | अभियंता |
| १३. | श्री. एन. के. बागुल | शाखा अभियंता |
| १४. | श्री.सी. एम. उगले | सहा.अभियंता,पा.पु.वि. |
| १५. | श्री.पी.डी.चव्हाण | सहा.अभियंता, बां.वि. |
| १६. | डॉ. एम.आर.शेख | आरोग्याधिकारी |
| १७. | श्री.राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १८. | श्री. किशोर सुडके | परवाना विभाग / बाजार विभाग |
| १९. | श्री.चंद्रकांत मोरे | प्र.लेखापाल |

| | | |
|---|---|---|
| २०. | श्री.संजय मोरे | कार्यालयीन अधीक्षक,आस्थापना विभाग |
| २१. | श्री.राजेंद्र माईनकर | प्र.भांडारपाल |
| २२. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २३. | श्री.चंद्रकांत जाधव | मलेरिया पर्यवेक्षक |
| २४. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| २५. | श्री.राजेश गायकवाड | लेखापाल,शिक्षण मंडळ |
| २६. | श्री.संभाजी सुडके | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २७. | श्री.अतुल पाटील | लिडींग फायरमन |
| २८. | श्री.गणेश खोंडे | प्रकल्प विभाग |
| २९. | श्री.रविकिरण पाटकरी | वृक्ष समिती प्रमुख |
| ३०. | श्रीमती मीना सातभाई | महिला व बालकल्याण विभाग |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

म.नगरसचिव आज मराठी भाषा गौरव दिन मराठी म्हणजे गोडवा, मराठी म्हणजे प्रेम, मराठी म्हणजे संस्कार, मराठी म्हणजे आपुलकी आणि मराठी म्हणजे महाराष्ट्र या मराठी भाषा गौरव दिनाच्या सर्वप्रथम शुभेच्छा देतो. आज अर्थसंकल्पीय सभेच्या कामकाजाला सुरुवात करीत आहोत. या आधी प्रशासना मार्फत स्थायी समितीपुढे हा अर्थ संकल्प सादर झाला होता. स्थायी समितीमध्ये विभागप्रमुखांनी दिलेल्या सूचना व तरतूदीचा विचार करुन वाढ, घट करुन आज पुन्हा अर्थ संकल्प महासभेसमोर सादर केलेला आहे. मनपाच्या इतिहासात प्रथमच प्रशासक हा अर्थ संकल्प सादर करीत आहे. आणि मुदतपूर्व हा अर्थसंकल्प महासभेसमोर आला आहे. सुरवातीला मी आयुक्त तथा प्रशासक महोदयांना विनंती करेन अर्थसंकल्पाचे विवेचन महासभेसमोर सादर करावे .

म.प्रशासक प्रथम नमस्कार धुळेकरांना, दुसरा नमस्कार धुळयाच्या गावदेवी एकविरा मातेला आणि तिसरा नमस्कार मराठी मातीला आज मला आनंद होत आहे. धुहे शहराचे प्रशासकीय बजेट मांडण्याची मला संधी मिळते आहे. चौथा नमस्कार त्या जिजाऊ ,सावीत्री ,रमाई माऊलींना या सगळयांची शिदोरी घेऊन आज मी सर्वासमोर उभी आहे. त्या होत्या म्हणून आम्ही येथे आहोत. दर वर्षीच्या बजेट पेक्षा या वर्षीचे बजेट थोडे वेगळे असणार आपली मनपाची आर्थिक स्थिती आहे. आपले जे आर्थिक स्त्रोत आहे या सगळयांचा विचार करुन भान ठेऊन सादर करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रशासनाकडून स्थायी समितीपुढे बजेट आले त्यानंतर त्याच्यात सुधारणा करुन ॲडीशन, सोल्युशन करुन आज महासभेसमोर अंतिम करतो आहोत. एक विशेष योगायोग असाही आहे की राज्याचा ही अंतरिम बजेट आज मांडल्या जाणार आहे. प्रशासक म्हणून मी हे मांडलेले बजेट हे अंतरिम बजेटच असे मानायला हरकत नाही. त्यामुळे

नेहमीची कामे गटर, वॉटर, मिटर या छोटया कामांना कात्री लाऊन जी कामे महिलांच्या कल्याणासाठी, मुलांच्या कल्याणासाठी, शाळांच्या उन्नतीसाठी , शहराच्या भविष्याच्या वाटचालीमध्ये वेगळी कामे करण्यासाठीचे बजेट मांडण्याचा माझा प्रयत्न असेल. बजेट रिझल्ट ओरिएन्टेड असावे. हे बजेट महिलांचा विचार करणारे, जेंडर आरिएन्टेड असणार आहे. यामध्ये दिव्यांगांच्या कल्याणाचा विचार केलेला आहे. जिल्हा परिषदेमार्फत मिशन संवेदना सुरु आहे. आशा वर्कर त्याचा सर्व्हे करत आहे. याच कार्यक्रमाचा मनपाही भाग झाली. शहरातील दिव्यांगाचा सर्वंकश सर्व्हे करायचा प्रयत्न आपण करतो आहोत. त्यासाठी लागणारी सहाय्यक साधने तो देण्याचा प्रयत्न आपण या वर्षात करणार आहोत. त्यासाठी तरतूदी या बजेटमध्ये आहेत. महिलांचा विचार यामध्ये मोठया प्रमाणावर केलेला आहे. एकूणच आपली हद्दवाढ झाल्यानंतर या गेल्या पाच वर्षामध्ये हद्दवाढ भागाचे सिटी सर्व्हेचा मेजर विषय प्रलंबित होता. सोबतच या भागाची विकास आराखडयाचे काम संथ गतीने सुरु आहे. मी जॉईन झाल्यापासून गेल्या ६ महिन्यापासून त्याला गती देण्याचा प्रयत्न केला आहे. या बजेटमध्ये पीएलयु करुन शासनाकडे विकास आराखडा कसा जाईल, लवकर मंजूर कसा केला जाईल यासाठी बजेट मध्ये तरतूद केली आहे. छोटी छोटी कामे आपण दुय्यम करतो ती कामे मागे राहिली शहराच्या विकासावर त्याचा परिणाम होतो. छोटी छोटी कामे जी विकासाला चालना देणारी आहेत. या सगळयांचा अंतर्भाव करण्याचा प्रयत्न बजेट मध्ये आहे. खऱ्या अर्थाने दहा-आकरा महिन्यामध्ये बजेट सादर झाल्यानंतर पूर्ण करण्याचा प्रयत्न आमचा असणार आहे. तेव्हाच त्याचे रिझल्ट आपल्याल दिसतील. जवळ जवळ प्रशासनाने सादर केलेले ७२५ कोटीचे बजेट, विविध विभागांमार्फत या सूचना आल्या. तरतूदींचा, शासकीय योजनांचा समावेश केल्यानंतर हे बजेट जवळ जवळ १७२८.१३ कोटी इतक्या रकमेचे झाले आहे. स्थायी समिती मार्फत प्रस्तावित केले आहे. उत्पन्नाची साधने वाढवण्याचा प्रयत्न करुन कुठलाही कर, कुठलीही करवाढ या बजेट मध्ये आंतर्भूत केलेली नाही. मागील वेगवेगळया आऊटस्टँडींग रकमा वसुल करण्याचा आमचा प्रयत्न असेल. या वर्षभरात मोठया प्रमाणावर धुळे मनपासाठी खूप साऱ्या योजनामधून शासनाकडून आपल्याला भरीव निधी मिळालेला आहे. राज्य शासनाचे सहकार्य आपल्याला राहिलेले आहे. अमृत मिशन मधून पहिल्या टप्पयामध्ये शहरासाठीची जिवनदायीनी अक्कलपाडा योजना मंजूर झाली ती योजना याच वर्षी पूर्ण झाली. तीचा लोकार्पण सोहळा या बॉडीची मुदत संपत असतांना शेवटच्या दिवसांत केला. शहराला ८ ते १० दिवसातून मिळणारे पाणी २-३ दिवसा आड देण्याचा प्रयत्न केला काही भागांमध्ये १ दिवसाड पाणी मिळत आहे. शहरातील लोकांना आवाहन राहिल पाणी सांभाळून वापरावे. अक्कलपाडयाचे काम पूर्ववत झाले आहे. मनपाकडून हिस्स्याची रक्कम दयायची राहिली आहे. ती दयायची तरतूद कोटी आपण या बजेट मध्ये केली आहे.अमृत १ अंतर्गत मलनिस्सारणाचा टप्पा १ (भूमिगत गटार)योजनेचे काम देवपूरात चालू आहे. या हिस्स्याची पण

तरतूद अंदाजपत्रकात केली आहे. मलनिस्सारण योजना टप्पा क्र. २ मंजूर झाली आहे. टेंडर प्रक्रीया सुरु आहे. अमृत २ मधून पाणीपुरवठयची टप्पा क्र.२ आपण करतो आहोत. २ मध्ये हद्दवाढ भागातील जी ११ गावे आहे. त्या गावातील वितरण व्यवस्था आणि २२ जलकुंभ त्यात पाणी आहे पण रिझर्व्हायर नसल्यामुळे २२ रिझर्व्हायर आपण यात करणार आहोत. बाभळे व तापीचे उद्भव मधली कामे यांत घेतली आहे. एसएलटीसीपुढे मान्यतेला हा प्रस्ताव पाठवाला आहे. या वर्षभरात पूर्ण करुन ११ गावे पाण्यापासून वंचित आहे. त्यांना पाणी दयायचा प्रश्न असणार आहे. तसेच व्यापारी संकुलातून मिळणारे उत्पन्न पुढील विकासासाठी कामी येणार आहे. व्यापारी संकुलासाठी तरतूद ठेवली आहे. हे कामही या अर्थसंकल्पातून पूर्ण करुन जेणे करुन उत्पन्नाचे साधन निर्माण होईल. स्वच्छ भारत मध्ये खूप मोठया प्रमाणावर निधी प्राप्त झाला. याचाच भाग म्हणून बायोगॅस प्रकल्पाचे काम सुरु केले आहे. मी जेव्हा आले तेव्हा हे काम बंद स्थितीत होते. मार्च अखेर पर्यंत हा प्रकल्प पूर्ण होईल.ओल्या कचऱ्याचे प्रोसेसिंग होईल. यातून इलेक्ट्रीसिटी जनरेट होऊन ग्रीउमध्ये देणे किंवा सीएनजी चा प्राजेक्ट तेथे करता येईल. घरोघरी जाऊन कचरा संकलनासाठी तक्रार निवारण कक्ष स्थापन केला आहे. ई गर्व्हनन्स माध्यमातून जन्म मृत्यु दखल्यांव्यतीरिक्त लायसन्स देण्याचा प्रयत्न होईल. बिल्डींग परिमिशन ही आपण यातून करु. हद्दवाढ भागात सोईसुध्दा पुरवण्याचा मानस आहे. सिटी सर्व्हे प्रलंबित आहे. हे काम हद्दवाढ विकास योजने अंतर्गत पूर्णत्वास येईल. विकास शुल्कासाठी जास्तीचा भूर्दंड लोकांना दयावा लागतोय. त्यामुळे बिल्डींग परमिशनसाठी फाईली त्या भागातून येत नाही. शासनाकडून मंजूर झालेल्या मूलभूत सोई सुविधा सुवर्णजयंती नगरोत्थान आहे. या योजनेतून १२६ कोटी निधी ग्रामीण भागाचे मा. आमदार महोदय कुणाल पाटील, शहराच्या माजी महापौर प्रतिभाताई चौधरी , माजी महापौर प्रदीप कर्पे ,सन्मा खासदार भामरे साहेब , मा. मंजूळाताई गावीत , शहराचे आमदार मा. फारुख शाह यांच्या प्रयत्नातून निधी मोठया प्रमाणावर शासनाकडून आणला आहे. वेगवेगळया योजना आणण्याचा प्रयत्न केला आहे. २०१९ नंतर १०५ चौ. मी. विस्ताराचे शहर झाले. हे शहर एज्युकेशनल हब आहे. व्यापारी केंद्र आहे. आपलया सर्वांना शहराची व्याप्ती माहित आहे. इंटर्नल कम्युट सिस्टीम आपल्याकडे नव्हती याचा भाग म्हणून ई बस चालू करण्याचा प्रस्ताव सादर केला. ३८ बस आपल्याला प्राप्त होणार आहे. ट्रक टर्मीनस जवळ आपला बस डेपो असणार आहे. ट्रक टर्मीनस साठी सुविधा पाहिल्या तशा दिल्या गेल्या नाहित. यासाठी ५ कोटी केंद्र शासनाकडून मिळणार आहे. यात अद्यावत ट्रक टर्मीनस, व्हे-ब्रिज, ढाबा , तेथील इमारत, शॉपिंग गाळे , रस्ते हे सर्व तेथे असणार आहे. तिर्थ क्षेत्र विकास योजने अंतर्गत एकविरा देवीचे मंदीर विकास आपण करणार आहोत. यासाठी निधी सरकार कडून मिळणार आहे. शाळांच्या बाबत सांगायचे तर परिस्थतीती कठीण आहे. उर्दू शाळा फक्त चालू आहे. आमदारांनी निधी दिला आहे. सुविधा देण्यासाठी , मॉडेल स्कूलसाठी. मराठी शाळा क्र. १४ नं साठी प्रस्ताव आपण

डीपीडीसी तून दिला आहे. शालांतर्गत क्रिडा व वकृत्व स्पर्धा वगैरे असे कार्यक्रम घेण्यासाठी स्थिती आपल्याकडे वाईट आहे. पंचकर्म दवाखाने पुन्हा चालू करणेसाठी बजेटमध्ये प्रयत्न असेल. मे महिन्यापर्यंत ही सुविधा धुळेकरांसाठी उपलब्ध् करुन देणार आहोत. पाण्याची नासाडी रोखण्यासाठी संगणकीय पध्दतीने कमांड आणि कंट्रोल रुम यासाठी करणार आहोत. मनपाच्या अस्तित्वात असलेल्या ४० टाक्या व नविन होणाऱ्या २२ टाक्या यांना कंट्रोल करुन उद्भवाचे ठिकाणे कंट्रोल करणे ही सिस्टीम आपल्याला मोबाईलवर कळावी प्रत्येकाला यासाठीचा प्रयत्न असणार आहे. हा प्रस्ताव मुख्यमंत्री महोदयांकडे पाठवणार आहोत. हे राज्यातले पायलट प्रोजेक्ट म्हणून त्याला मंजूरी मिळेल त्या दृष्टीने प्रयत्न करीत आहोत. पांझरेच्या शाश्वत विकासासाठी व स्वच्छतेसाठी, नदी संवर्धनासाठी आपण यावेही यासाठी विशेष तरतूद आपण करतो आहोत. महीला व बालकल्याणासाठी जवळ जवळ १.७५ कोटी उपलब्ध होणार आहे. हे त्यांच्याच कामासाठी वापरले जातील. महिलांना व्यवस्थीत प्रशिक्षण देण्यासाठी आरोग्य तपासणी साठी वापरला जाईल. मुलींसाठी सुकन्या योजना राबवणार आहोत. याची तरतूद आहे. त्यांचे हफ्ते राखीव निधीतून दिले जातील. दिव्यांगाना साधने उपलब्ध होण्यासाठी बजेट मध्ये तरतूद असेल. त्यांचा मिशन संवेदना सर्व्हे पूर्ण करुन घेऊन, कॅम्प करण्यासाठी तरतूद केली आहे. या स्वरुपाचे कार्यक्रम मोठया प्रमाणावर केले जातील. याच कामांवर निधी खर्च होणार आहे. थोरपुरुषांचे पुतळे व चबुतरा उभारणे साठी शासन मान्यता आपल्याकडे आल्या आहेत. महिला सक्षमीकरण करण्यासाठी बचत गटांच्या उत्पादनांना प्लॅटफॉर्म उपलब्ध करुन दिले जाणार आहे त्यासाठी महिलांच्या मागणीनुसार महिला बचत गटांसाठी एकता मॉलची निर्मिती करण्यात येणार आहे. एनयुएलएम अंतर्गत तरतूद करणार आहोत. हरीत धुळे संकल्पने अंतर्गत २५ एकर जागेवर बांबू प्लांटेशन करण्याचा प्रयत्न असेल. इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फंड केंद्र शासनाने उपलबध करुन दिला आहे. ५० वर्षासाठी बिनव्याजी लोन असणार आहे. यातून मनपाचे हिस्से देण्याकरीता निधी उपलब्ध होईल. उत्पन्नवाढीसाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न असणार आहे. घरपट्टी व पाणीपट्टी थकबाकी वसुल करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. धुळेकरांना आवाहन राहिल जे देणे कित्येक वर्षापासून थकलेले आहे ते वेळेत भरु मनपाला सहकार्य करावे. राज्य शासनाकडून मुद्रांक शुल्कासाठी अनुदानासाठी प्रस्ताव जातील. शहरातील मोठा विषय अनधिकृत बांधकाम व अनधिकृत नळ कनेक्शनचा आहे. गुठेवारी रेल्युलराईजेशन प्रस्ताव प्रासेस केले आहे. याचाही मोठा हातभार लागेल. यासाठी येणारे उत्पन्न बजेट मध्ये धरले आहे. एलबीटीची थकबाकी रिकव्हरी करणे असेसमेंट कामे करणे वर भर राहणार आहे. माझे अवाहन राहिल मनपाच्या ज्या येणे रकमा आहे त्या त्वरीत देण्याचा प्रयत्न करावा. या बजेटमध्ये आवाक्याच्या बाहेरचे करण्याचा प्रयत्न असणार नाही. यावर्षी मनपाचे मोठे देणे आहे. मनपा कर्मचाऱ्यांना पैसे दयायचे आहे. शिक्षण मंडळाच्या कर्मचाऱ्यांना पैसे दयायचे आहे. ही सगळी देणी यावर्षात

देण्याचा प्रयत्न राहणार आहे. आपल्या सगळयांच्या सहकार्याची गरज आहे. अशी अपेक्षा बाळगते. माझ्या टीमचे आभार मानते. रिझल्ट ओरीएन्टेड बजेट देण्यासाठी फिल्डवर काम करुया. आपण माझ्या सोबत राहणार हा विश्वास माला आहे. बजेट तयार करतांना सर्व कार्यालयीन सहकारी त्यांचे आभार मानते. माझ्या कुटुंबाचेही आभार मानते. ज्यांच्या सोबत मी काम करते या सर्वमुळे मला हे बजेट करता आले असे मी समजते. स्वच्छ, पारदर्शक, कार्यक्षम व्यवस्था कशी निर्माण करता येईल. आणि सामान्य नागरिकांनासाठी मी जो निर्णय घेतला आहे तो आपल्या माध्यमातून शेवटच्या माणसांपर्यंत जाईल यासाठी प्रयत्न करत असलेल्या पत्रकार बंधूचे व सगळयांचे आभार मानते. हिस्टोरिकल बजेट मांडण्याची संधी प्रशासक व आयुक्त म्हणून मला मिळाली याची नोंद् होईल. हे बजेट ॲक्च्युअल इंम्प्लिमेंट करता यावे यासाठी विठू माऊलीला प्रार्थना करते. विशेष आभार मुख्यलेखाअधिकारी व त्यांचे टिम मेंबर श्री अटलाणी यांनी विशेष मेहनत घेतली आहे.

म.कार्य. अभियंता — आपल्या शहरात नकाणे तलावाच्या पायथ्याला मातोश्री वृध्दाश्रम आहे. तेथे पाण्याची सोय नाही. नकाणे तलाव कोरडा असल्यामुळे पाण्याची समस्या आहे. तेथे ४२ वृध्द व्यक्ती २०ते २२ लोकांचा स्टाफ आहे. तेथे लाईन टाकण्यासाठी तातडीने प्राव्हीजन करावी लागेल. याबाबत नगरसचिवांना पत्र दिले आहे. तरतूद करावी ही विनंती.

म.अभियंता — आज जो अर्थ संकल्प सादर झाला हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक आणि नागरिकांचा विचार करुन खूप सुंदर व छान भरीव तरतूदी व नागरिकांवर कोणतेही करवाढ न करता उत्कृष्ठ सादर केला आहे. मा. पंतप्रधानांची सर्वांसाठी घरे यासाठी विशेष तरतूद करावी लागणार आहे. रमाई आवस योजना, पंतप्रधान आवास योजना गरीबांसाठी घरे, दवाखान्याची योजना आहे त्यांचाही समावेश करावे. व केंद्र शासनाने हर घर जल ही योजना आहे. यात सर्वासाठी नळ कनेक्शन देणे बाबतचा ही समावेश व्हावा. व मा. मुख्यमंत्री यांनी सूचवलेले वाचनालय व विरंगुळा केंद्र याबाबत तरतूद व्हावी. फेरीवाला धोरणासाठी तरतूद करावी. हद्दवाढ भागातील व इतर भागातील सार्वजनिक शौचालय व वैयक्तीक शौचालय यासाठी तरतूद व्हावी.

म.प्रशासक — मा.पंतप्रधानांची घरांसाठीची प्रधानमंत्री आवास योजना आहेत यावर्षी वेगळया पध्दतीने त्याचे लॉचिंग होईल. मनपा तर्फे १००० घरांचे टारगेट आहे. प्रस्ताव यायला सुरुवात झाली आहे. छाननी करुन प्रकल्प अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवू. विरंगुळा केंद्रासाठी तरतूद केली आहे. फेरीवाला धोरण आहे त्यामध्ये सर्व्हेसाठी पण १५ लाखाची तरतूद ठेवली आहे. व क्षेत्र निश्चीतीसाठी. हर घर जल मिशनचे अमृत २ अंतर्गत तरतूद आहे. नळ कनेक्शन मध्ये पैसे कर्टेल झाले या वर्षी पुन्हा प्रयत्न असणार आहे. ही सगळी कामे झाल्यानंतर त्याचे प्रस्ताव दाखल करु. तसेच स्थायी समितीच्या अंदाजपत्रकात कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी मनपा निधीअंतर्गत ४.०८ कोटी मात्र मनपा निधीअंतर्गत तरतूद करण्यात आलेली होती तथापी सदरचे काम १५ व्या वित्त आयोगाच्या निधीअंतर्गत घेण्यात येणार आहे. त्यामुळे सदर तरतूद

कमी करण्यात येत आहे. या व्यतीरिक्त ही काही गोष्टींचा आंतर्भाव करायचा राहिला आहे. त्याचा समावेश यामध्ये करावा. या सर्वांचा आंतर्भाव करुन विभाग प्रमुखांनी दिलेल्या सूचनांचा विचार करुन सन २०२३-२४ चे सुधारित २०२४-२०२५ चे अंदाजपत्रक व वृक्ष प्राधिकरण समितीचे अंदाजपत्रक योग्य त्या फेरबदालासह अंतिम करण्या महासभे मार्फत मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १९ दिनांक २७/०२/२०२४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ अन्वये धुळे महानगरपालिकेचे सन २०२३-२४ चे सुधारित व सन २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रकास (मा.स्थायी समिती)/ मा.प्रशासक ठराव क्रमांक ३८ दिनांक २०/०२/२०२४ अन्वये मे.महासभेपुढे सादर करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

सन २०२३-२४ चे सुधारीत व सन २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रकातील जमा व खर्चाच्या प्रत्येकबाबीवर अभ्यास करून तसेच विचार विनियम करून खालीलप्रमाणे सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रकात दुरूस्ती/ सुधारणा करून अंतिम करणेस मान्यता देण्यात येत आहे.

तसेच खालील नमूद केलेल्या बाबीसाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात दर्शविण्यात आलेली तरतूद ही प्राथमिक स्वरूपाची तरतूद असून संबंधित विभागांनी याबाबत डिसेंबर अखेर प्रत्यक्ष होणाऱ्या रक्कमेचे पुर्नविनियोजन अथवा पुरक मागणी करून सुधारीत अंदाजपत्रकात करून घेणे आवश्यक असेल या अटीवर खालील नमूद तरतूदी करण्यात येत आहे.

**भांडवली जमा बाजू**

| अ.क्र. | लेखाशिर्षक | मे.स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी | मे.महासभेने सुचविलेल्या शिफारशी | वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | जमीन विकास शुल्क | ७.६४ | १२.६४ | ५.०० |

**भांडवली खर्च बाजू**

| अ.क्र. | लेखाशिर्षक | मे.स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी | मे.महासभाने सुचविलेल्या शिफारशी | वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | जमीन विकास शुल्क अंतर्गत कामे | ७.६७ | १२.६४ | ५.०० |
| २ | मनपामार्फत कचऱ्यावर प्रक्रिया करणे | ४.०८ | ०.०८ | -४.०० |
| ३ | प्रशासक निधी (अत्यावश्यक कामे) | ०.०० | ४.०० | ४.०० |
| ४ | नवीन पाईपलाईन टाकणे. | ०.५० | ०.८५ | ०.३५ |

प्रशासनामार्फत सादर केलेल्या सुचना लक्षात घेवून तसेच स्थायी समितीने मान्यता दिल्यानुसार व मनपा उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ करुन सन २०२३-२४ चे रक्कम रूपये ६७५.३३ कोटीचे सुधारीत व सन २०२४-२५ चे रक्कम रूपये १७३३.१३ कोटीचे मुळ अंदाजपत्रक तसेच वृक्ष प्राधिकरण समितीचे अंदाजपत्रकास वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**